# निविदा

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्या कार्यालयासाठी सोनी कंपनीचा Sony Bra via W ७०० C kdl-48 W 700 C या कंपनीचा एल.ई.डी. दूरचित्रवाणी संच खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.
निविदा क्र.संकीर्ण-१०६५/प्र.क्र.३३३/नापु-११
दिनांक : १ ऑक्टोबर,२०१५.

मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्या कार्यालयासाठी सोनी कंपनीचा Sony Bra via W ७०० C kdl-48 W 700 C या कंपनीचा एल.ई.डी. दूरचित्रवाणी संच खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सादर करावयाचा शेवटचा दिनांक १७ ऑक्टोबर,२०१५ दुपारी २.०० वा. पर्यंत असून तोपर्यंत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १९ ऑक्टोबर,२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. संबंधित निविदाधारकांच्या उपस्थितीत श्री.उ.द.वाळुंज, उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दालन क्र.२१९-विस्तार, यांच्यासमोर उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क शासन राखून ठेवत आहे. उपरोक्त नमूद Sony Bra via W ७०० C kdl-48 W 700 C या कंपनीचा एल.ई.डी. दूरचित्रवाणी संच खरेदीबाबतचे दरपत्रक अवर सचिव, ना.पु.११, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावाने मोहरबंद पाकिटातून दिनांक १७ ऑक्टोबर,२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत पाठविण्यात यावे.

(वि. द. शेवडे)
शासनाचे अवर सचिव

## प्रपत्र – अ

१) मोहरबंद लिफाफ्यावर " मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्या कार्यालयासाठी एल.ई.डी. दूरचित्रवाणी संच पुरवठा करण्याबाबत निविदा " असे लिहिणे आवश्यक आहे.

२) निविदाकाराने इसारा रक्कम म्हणून रू.५०००/- (रूपये पाच हजार फक्त) कक्ष अधिकारी/रोखशाखा, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या नावाने मुंबई येथील बँकेत वटणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनादेश (डी.डी.) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. **अन्यथा, निविदा स्विकारण्यात येणार नाही.**

३) **निविदा प्रपत्र भरून सादर करावयाचे ठिकाण** :- अवर सचिव, ना.पु.११, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावाने मोहरबंद पाकिटातून दिनांक १७ ऑक्टोबर,२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

४) प्राप्त निविदा दिनांक १९ ऑक्टोबर,२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री.उ.द.वाळुंज, उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दालन क्र.२१९-विस्तार, येथे उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारक स्वत: वा त्यांचा एक प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.

५) दूरचित्रवाणी संचाचे दर व्हॅट वगळून व व्हॅटसह स्वतंत्रपणे नमूद करावे. निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर हे निविदा स्विकृतीनंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील.

६) पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेला दूरचित्रवाणी संचाचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

७) मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्या कार्यालयासाठी एल.ई.डी. दूरचित्रवाणी संचाचा पुरवठा केल्यानंतर त्यासंबंधीचे देयक आगाऊ मुद्रांक पावतीसहीत सादर करावे. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

८) निविदा सादर करताना लिफाफा सिलबंद करून सादर करावा.

९) निविदा लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत :-

अ) प्रत्येक निविदाकारास इसारा रक्कम म्हणून रू.५०००/- (रूपये पाच हजार फक्त) कक्ष अधिकारी/रोखशाखा, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) काढून निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) आस्थापना व दुकाने अधिनियम, लायसन्स प्रमाणपत्राची प्रत.

क) निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले आयकर भरण्यासंबंधीच्या प्रमाणपत्राची प्रत/तसेच मागील तीन वर्षाची आयकर विवरणपत्रे व पॅनकार्ड प्रत सोबत जोडावी लागेल.

ड) व्हॅट नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व व्हॅट भरल्याचे विवरणपत्र.

१०) शासनाने निविदा स्विकृत केल्यानंतर इतर कोणत्याही कारणामुळे दरवाढ झाल्यास, निविदाकाराने निविदेमध्ये सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करून देण्यात येणार नाही.

११) यशस्वी निविदाधारकास निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत केलेल्या दूरचित्रवाणी संचाचा पुरवठा करण्याबाबत स्वतंत्रपणे रू.१००/- च्या बॉंड पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

(वि. द. शेवडे)
शासनाचे अवर सचिव